# इंग्रजीतील Para Jumbled सोडवण्यासाठी काही मूलभूत नियम.

### 1. Opening Sentence ओळखा:

परिच्छेदाची सुरुवात सामान्यतः परिचय करून देणाऱ्या वाक्याने होते. हे वाक्य बहुतेक वेळा विषयाची ओळख करून देते किंवा मुख्य कल्पना मांडते. यामध्ये नाम (Noun) किंवा सामान्य कल्पना सुरु होते, सर्वनाम (Pronoun) सहसा सुरुवातीला नसते कारण ते आधी उल्लेख केलेल्या नामासाठी वापरले जाते. कालक्रमानुसार असल्यास, सुरुवातीची घटना पहिली ओळ असू शकते.

### 2. Pronouns चा संबंध शोधा:

सर्वनामे (he, she, it, they, this, that, these, those) नेहमी त्यांच्या अगोदर उल्लेख केलेल्या नामाकडे निर्देश करतात. उदा, जर एखाद्या वाक्यात 'he' असेल, तर त्याच्या आधी 'John' किंवा त्या व्यक्तीचे नाव आलेले असणे आवश्यक आहे.'This' आणि 'these' जवळच्या गोष्टींसाठी, तर 'that' आणि 'those' दूरच्या गोष्टींसाठी वापरले जातात, याचा संदर्भ लक्षात घ्या.

MPSC Guidance

### 3. Connecting Words वर लक्ष द्या:

- and, but, or, so, therefore, however, moreover, furthermore, also, in addition, etc. वाक्यांमधील संबंध दर्शवतात.
- 'And', 'also', 'furthermore', 'moreover', 'in addition' हे समान कल्पना जोडतात.
- 'But', 'however', 'yet', 'nevertheless' हे विरोधाभास दर्शवतात.
- 'So', 'therefore', 'thus', 'consequently' हे परिणाम दर्शवतात.
- 'Because', 'since', 'as' हे कारण दर्शवतात.
- या शब्दांच्या आधारे वाक्यांचा क्रम लावणे सोपे होते.

### 4. Chronological Order तपासा:

जर परिच्छेद एखाद्या घटनेचे वर्णन करत असेल, तर वाक्यांचा क्रम घडलेल्या वेळेनुसार असण्याची शक्यता असते. वेळ दर्शवणारे शब्द (first, then, after that, later, finally, meanwhile, during, etc.) महत्त्वाचे ठरतात.

## 5. Theme and Flow of Ideas समजून घ्या:

परिच्छेदामध्ये एका विशिष्ट विषयावर चर्चा केलेली असते. वाक्यांचा क्रम असा असावा की कल्पनांचा प्रवाह सहज आणि तार्किक वाटेल. एक कल्पना पूर्ण झाल्यावर दुसरी संबंधित कल्पना यायला हवी.

## 6.Interrogative and Exclamatory Sentences

प्रश्नार्थक वाक्ये सहसा परिच्छेदाच्या मध्यभागी किंवा शेवटी येतात, कारण ती मागील माहितीवर आधारित असू शकतात किंवा निष्कर्ष काढू शकतात.

उद्गारवाचक वाक्ये विशिष्ट भावना व्यक्त करतात आणि त्या भावनेच्या संदर्भातील वाक्ये त्याच्या आधी आलेली असण्याची शक्यता असते.

## 7. Specific to General or Vice Versa :

परिच्छेद सामान्य माहिती देऊन विशिष्ट उदाहरणाकडे जाऊ शकतो किंवा विशिष्ट उदाहरणाने सुरुवात करून सामान्य निष्कर्षापर्यंत पोहोचू शकतो. हा क्रम ओळखणे महत्त्वाचे आहे.

## 8.Negative and Positive Sentences:

नकारात्मक वाक्ये सहसा सकारात्मक वाक्यांनंतर येतात, कारण ती आधी मांडलेल्या गोष्टीला नकारतात किंवा त्यावर मर्यादा आणतात.

MPSC Guidance